पुढारी



दिल्ली : रोपट्यास पाणी घालून कार्यक्रमाची सुरुवात करताना केंद्रीय अ‍
राज्यमंत्री डॉ. भागवत कराड, शेजारी ज्ञानेश्वर मुळे, रवळनाथचे अध्यक्ष
एम. एल. चौगुले, संध्या कपूर.

# 'रवळनाथ'कडून कोव्हिड -योद्ध्यांचा राष्ट्रीय सन्मान

## केंद्रीय अर्थ राज्यमंत्री डॉ. कराड यांचे प्रतिपादन

**गडहिंग्लज : पुढारी वृत्तसेवा**

कोरोनाच्या पहिल्या टप्प्यात कोणत्याही प्रकारची माहिती नसतानाही कोव्हिड योद्ध्यांनी आपले प्राण पणाला लावून आजाराशी सामना केला. यात काहींना आपला जीव गमवावा लागला. अशा योद्ध्यांच्या नातेवाईकांचा रवळनाथने राष्ट्रीय स्तरावर सत्कार करून आपली सामाजिक बांधिलकी जोपासली आहे, असे प्रतिपादन केंद्रीय अर्थ राज्यमंत्री डॉ. भागवत कराड यांनी केले. दिल्ली येथील राष्ट्रीय सहकार प्रशिक्षण केंद्रामध्ये आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

प्रारंभी स्वागत व प्रास्ताविक रवळनाथचे अध्यक्ष एम. एल. चौगुले यांनी करताना रवळनाथ हौसिंग सोसायटीच्या गेल्या २५ वर्षांतील कामाचा आढावा घेतला. यावेळी दिल्ली येथील कोव्हिडमध्ये मृत पावलेल्या योद्ध्यांच्या नातेवाईकांचा आर्थिक मदत देऊन गौरव करण्यात आला.

डॉ. कराड म्हणाले, भारताने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली कोरोनाच्या पहिल्या लाटेपासून आदर्शवत काम केल्यानेच जगात भारताचे नाव उंचावले. जगात एकूण १२ लसी तयार झाल्या. त्यातील दोन लसी भारतातील असून जगात सर्वाधिक वेगाने व मोठ्या संख्ये लसीकरण केवळ भारतानेच केले आ यातूनच जगाला भारताची ताकद दिसली स्वत:साठी नव्हे तर समाजासाठी य महामारीत काहींनी झोकून देऊन काम केले त्यात काहींचा दुर्दैवाने मृत्यू झाला आज 'रवळनाथ'सारख्या ग्रामीण भागातील संस्थेने दिल्लीत येऊन य योद्ध्यांच्या नातेवाईकांचा गौरव करणे म्हणजे राष्ट्रीय सन्मान केल्यासारख आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

राष्ट्रीय मानवाधिकार आयोगा सदस्य डॉ. ज्ञानेश्वर मुळे यांनीह रवळनाथच्या कामाचे कौतुक करू कोल्हापूर जिल्ह्यातील सहकार अतिश उत्तम असल्याने दिल्लीपर्यंत याच विस्तार पोहोचला असल्याचे स्पष् केले.

राष्ट्रीय मानवाधिकार विभागा पोलिस महासंचालक संतोष मेहर यांनीही मनोगत व्यक्त केले. सागर मा यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमा रवळनाथचे संचालक, दिल्लीमधील महाराष्ट्रवासीय तसेच विवि ठिकाणाहून आलेले कोव्हिड योद्ध्यां नातेवाईक, राष्ट्रीय सहकार प्रशिक्षण केंद्राचे कार्यकारी संचालक आशि द्विवेदी आदी उपस्थित होते. सहका प्रशिक्षण केंद्राच्या संचालिका संध्य कपूर यांनी आभार मानले.

तरुण भारत

शुक्रवार, ११ मार्च २०२२

# सामाजिक कर्तव्य म्हणून 'रवळनाथ'चे काम कौतुकास्पद

## अर्थ राज्यमंत्री डॉ.भागवत कराड यांचे प्रतिपादन : रवळनाथ हौसिंग फायनान्स सोसायटीकडून दिल्लीत कोरोना योद्ध्यांचा सत्कार

प्रतिनिधी
गडहिंग्लज

कोरोना कालावधीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्त्वाखाली विविध पातळीवर झालेल्या कामांमुळे जगात उत्कृष्ट देश म्हणून भारत उदयास आला. कोरोना कालावधीतील कामाची दखल घेत ग्रामीण भागातील संस्थेने दिल्लीत येऊन कोरोना योद्ध्यांना मदत आणि सत्कार करणारी ही देशातील एकमेव संस्था असल्याचे सांगत रवळनाथ को ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटीच्या कामाचे कौतुक केंद्रीय अर्थ राज्यमंत्री डॉ. भागवत कराड यांनी बोलताना केले.

दिल्ली येथील राष्ट्रीय सहकार प्रशिक्षण केंद्र सभागृहात गुरुवारी दुपारी पार पडलेल्या कार्यक्रमात अर्थ राज्यमंत्री डॉ. कराड बोलत होते. राष्ट्रीय मानव आयोगाचे सदस्य ज्ञानेश्वर मुळे यांची प्रमुख उपस्थिती होती.



नवी दिल्ली : रोपाला पाणी घालून कार्यक्रमाची सुरवात करताना केंद्रीय अर्थ राज्यमंत्री डॉ. भागवत कराड. यावेळी उपस्थित ज्ञानेश्वर मुळे, एम. एल. चौगुले यांच्यासह इतर.

रोपाला पाणी घालून कार्यक्रमाची सुरूवात झाली. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले यांनी उपस्थितांचे स्वागत करत संस्थेच्या २५ वर्षाच्या वाटचालीचा आढावा घेतला. यावेळी कोरोना योद्ध्यांचा व त्यांच्या कुटूंबीयांचा १० हजार मदतीचा धनादेश, शाल, गुच्छ देऊन मंत्री डॉ. कराड यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी बोलताना डॉ. कराड पुढे म्हणाले, भारतात कोरोना लसीचे संशोधन झाले नसते तर मोठी अडचण तयार झाली असती. पंतप्रधानांनी या संशोधकांची दखल घेत त्यांचा गौरव केला. जगात सर्वात जास्त लसीकरण भारतात झाले आहे. सरकारने राष्ट्रासाठी आणि समाजासाठी काम करायचे ठरवले असून अधिकाधिक लोकांना घरे देण्यासाठी केंद्र सरकारचे प्रयत्न आहेत तशी अर्थसंकल्पात तरतूद केल्याचे डॉ. कराड यांनी सांगितले. सहकारातून प्रगती होते हे स्पष्ट झाल्यामुळे देशात सहकाराचा प्रसार करण्यासाठी पंतप्रधानांनी नव्याने केंद्रात सहकार खाते निर्माण केले आहे. यातून गरीब जनतेला सहकाराचा लाभ देण्याचा प्रयत्न होणार असल्याचे सांगितले.

राष्ट्रीय मानव आयोगाचे सदस्य ज्ञानेश्वर मुळे यांनी मोठ्या शहरात नव्हेतर गडहिंग्लज सारख्या ग्रामीण भागात काम करणारी रवळनाथ सारख्या संस्था सहकारात उत्कृष्ट काम करत आहे. सहकारातून विकास साधता येतो. पण त्यासाठी श्री. चौगुले यांच्या सारखे मनापासून काम झाले पाहिजेत अशी अपेक्षा व्यक्त केली. राष्ट्रीय मानवाधिकार खात्याचे आयुक्त संतोष मेहरा यांनीही मनोगत व्यक्त केले. व्यासपीठावर एनसीयुआयचे कार्यकारी संचालक आशिष व्दिवेदी यांची उपस्थिती होती. व्यासपीठावरील मान्यवरांचा सत्कार अध्यक्ष चौगुले, संचालक प्राचार्य आर. एस. निळपणकर, संचालक मीना रिंगणे यांच्या हस्ते करण्यात आला.

आभार राष्ट्रीय सहकार प्रशिक्षण केंद्राच्या संचालिका संध्या कपूर यांनी मानले. प्रशासन अधिकारी सागर माने यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमास रवळनाथचे संचालक प्रा. विजय आरबोळे, महेश मजती, उमा तोरगल्ली, रेखा पोतदार यांच्यासह सभासद आणि दिल्लीतील कोरोना योद्ध्यांचे कुटूंबीय उपस्थित होते.

### 'रवळनाथ'मुळे निवारा चळवळीला हातभार !

कोल्हापूर हे देशातील सहकार चळवळीचे प्रमुख केंद्र आहे. या जिल्ह्यातील 'रवळनाथ'ने सहकाराचा संस्कार व संस्कृती जपली आहे, असे डॉ. मुळे यांनी आवर्जून नमूद केले. तर, चौगुले यांच्या दूरदृष्टीमुळेच संस्थेची भरभराट झाली. 'रवळनाथ'मुळे मोदींच्या निवारा चळवळीला मोठा हातभार लागला आहे. 'रवळनाथ'ने आता दिल्लीत यावे, त्यासाठी लागेल ते सहकार्य करू, अशी ग्वाही डॉ. कराड यांनी दिली.

सकाळ

# पंतप्रधान मोदींच्या धोरणामुळे सहकाराला बळ

## डॉ. भागवत कराड; नवी दिल्लीत 'रवळनाथ'तर्फे कोविड योद्ध्यांच्या नातेवाइकांचा गौरव

**सकाळ वृत्तसेवा**

गडहिंग्लज, ता. १० : देशातील सहकार चळवळीची सुरुवात महाराष्ट्रातून झाली. वैकुंठभाई मेहता, बॅ. धनंजयराव गाडगीळ व विखे-पाटील यांनी सहकार चळवळीचा पाया घातला. राज्याच्या विकासात या चळवळीचे मोठे योगदान आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी केंद्रात स्वतंत्र सहकार मंत्रालय सुरू केल्यामुळे सहकारी चळवळीला बळ मिळेल, असा विश्वास केंद्रीय अर्थ राज्यमंत्री डॉ. भागवत कराड यांनी व्यक्त केला. राष्ट्रीय सहकारी संघ आणि श्री रवळनाथ को-ऑप हौसिंग फायनान्स सोसायटी यांच्यातर्फे स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव व रवळनाथच्या रौप्य महोत्सवानिमित्त आयोजित दिल्ली येथील कोविड योद्ध्याच्या नातेवाईकांच्या गौरव सोहळ्यात ते बोलत होते. राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाचे सदस्य डॉ. ज्ञानेश्वर मुळे यांची प्रमुख उपस्थिती होती. नवी दिल्ली येथे राष्ट्रीय सहकारी संघाच्या सभागृहात हा कार्यक्रम झाला.



**नवी दिल्ली : रवळनाथ संस्था व राष्ट्रीय सहकार प्रशिक्षण केंद्रातर्फे आयोजित कार्यक्रमाचे रोपाला पाणी घालून उद्घाटन करताना डॉ. भागवत कराड. शेजारी डॉ. ज्ञानेश्वर मुळे, एम. एल. चौगुले, डॉ. संध्या कपूर.**

केंद्रीय राज्यमंत्री कराड म्हणाले, "पंतप्रधान मोदी यांनी दूरदृष्टीने देशभर महिन्याचे लॉकडाउन करून कोरोनावर नियंत्रणासाठी सुविधा उपलब्ध केल्या. भूकबळी टाळण्यासाठी गोरगरिबांना मोफत अन्नधान्य दिले. दरम्यानच्या काळात कोविड प्रतिबंधक लसीकरणाची धडक मोहीम राबवून कोरोनावर नियंत्रण मिळवले. लोकांची सेवा हीच ईश्वर सेवा आहे. म्हणूनच आपल्याला राष्ट्र आणि समाजासाठी काम करावे लागेल. त्यातूनच सेवाभावी असा एक नवा सक्षम देश उभा राहील. देशात महाराष्ट्र व गुजरातमध्ये प्रामुख्याने सहकार चळवळ वाढली. नव्या धोरणामुळे आता या चळवळीला देशभरात चांगले दिवस येतील आणि गरिबांना त्याचा लाभ होईल."

डॉ. मुळे म्हणाले, "देशातील एका टोकाच्या रवळनाथ सोसायटीने दिल्लीतील कोरोना योद्ध्यांच्या नातेवाईकांच्या गौरवातून सामाजिक उत्तरदायित्वाचा वसा जपला आहे." राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाचे आयुक्त संतोष मेहरा यांचेही भाषण झाले.

'रवळनाथ'चे संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले यांनी प्रास्ताविकात संस्थेच्या २५ वर्षांतील यशस्वी वाटचालीचा आढावा घेतला. 'रवळनाथ'चे प्रशासन अधिकारी सागर माने यांनी सूत्रसंचालन केले. राष्ट्रीय सहकारी संघाच्या संचालिका डॉ. संध्या कपूर यांनी आभार मानले. संघाचे कार्यकारी संचालक आशिष द्विवेदी यांच्यासह रवळनाथचे संचालक, कर्मचारी, सभासद उपस्थित होते.

### निवारा चळवळीला हातभार

कोल्हापूर हे देशातील सहकार चळवळीचे प्रमुख केंद्र आहे. या जिल्ह्यातील रवळनाथने सहकाराचा संस्कार व संस्कृती जपली आहे, असे डॉ. मुळे यांनी आवर्जून नमूद केले, तर चौगुले यांच्या दूरदृष्टीमुळेच संस्थेची भरभराट झाली. 'रवळनाथ'मुळे मोदींच्या निवारा चळवळीला मोठा हातभार लागला आहे. 'रवळनाथ'ने आता दिल्लीत यावे त्यासाठी लागेल ते सहकार्य करू, अशी ग्वाही डॉ. कराड यांनी दिली.

Kolhapur, Gadhinglaj-Today
11/03/2022 Page No. 4

पुढारी

# महाराष्ट्राच्या सहकारामुळेच देशात नवे सहकार खाते

## ना. भागवत कराड : गरिबांच्या घरासाठी अर्थसंकल्पात भरीव तरतूद

**नवी दिल्ली : प्रवीण आजगेकर**

महाराष्ट्र राज्यातील सहकार हा आदर्शवत असून सहकारामुळे ग्रामीण अर्थव्यवस्था सुधारत असल्याने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशात नवे सहकार खाते निर्माण केले असून याचा आता लाभ देशभरातील ग्रामीण भागालाहोणार आहे. देशातील गरिबांना घरे देण्यासाठीही मोदींनी अर्थसंकल्पात भरीव तरतूद केली असल्याचे प्रतिपादन केंद्रीय अर्थराज्यमंत्री डॉ. भागवत कराड यांनी केले.

नवी दिल्ली येथे श्री रवळनाथ हौसिंग फायनान्स सोसायटी आजरा (मल्टिस्टेट) या संस्थेतर्फे आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.



**नवी दिल्ली : येथे बोलताना केंद्रीय अर्थराज्यमंत्री डॉ. भागवत कराड.**

पंतप्रधान मोदींच्या कामाचे कौतुक करताना डॉ. कराड म्हणाले, कोरोनावेळीही लॉकडाऊन लावण्यात आले. मात्र, गरिबांना मोफत धान्य देऊन रोजी-रोटी सुरू ठेवली. त्या कालावधीत या महामारीच्या विरोधात लढण्यासाठी आवश्यक सेवासुविधा उपलब्ध करून घेतली. यंदाच्या अर्थसंकल्पामध्ये गरिबांना घरे उभारण्यासाठी भरीव तरतूद केली असून जनतेची सेवा करण्याचे अखंड ध्येय मोदींचे असल्याचे ते म्हणाले.

कार्यक्रमास राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाचे सदस्य डॉ. ज्ञानेश्वर मुळे, विभागाचे पोलिस महासंचालक संतोष मेहरा, रवळनाथचे अध्यक्ष एम. एल. चौगुले, राष्ट्रीय सहकार प्रशिक्षण केंद्राचे कार्यकारी संचालक आशिष द्विवेदी, संचालिका संध्या कपूर उपस्थित होत्या.

My Kolhapur Edition
Mar 12, 2022 Page No. 9
newspaper.pudhari.co.in

# RCHFS felicitates kin of Covid warriors; MoS Karad attends

Emotional moment for families who lost their kin

by **Rohit Gupta** — March 11, 2022 in **From States** 0



Maharashtra based Shree Ravalnath Cooperative Housing Finance Society (RCHFS) organized an event to honour the kin of Corona Warriors who sacrificed their lives saving the patients.

An emotional moment for many participants, multi-state co-op RCHFS organized this event at NCUI headquarters in Delhi on Wednesday, in which Union Minister of State for finance Bhagwat Karad, among others participated.

About 13 kin of Covid-19 Warriors were felicitated with a cash prize of Rs 10k on the occasion. During the proceeding of felicitation to the family members of Covid warriors, a few of them got emotional.

Addressing the participants, MoS Karad recalled those days when the nation was grappling with the outbreak of Covid-19 and said many doctors and members of the medical fraternity lost their lives in the service of society. There was a shortage of beds, PPE kits, masks, ventilators but we overcame the Covid crisis, he stated.

Lauding RCHFS for playing its part as a responsible member of the society, Karad said the multi state co-op society (RCHFS) is doing praiseworthy work in the interest of poor strata of the community and giving finance to them at a reasonable rate of interest.

Hinting at the robust co-op movement in the country, Karad said the cooperative movement of the country works with full dedication to help the downtrodden people across the country and no one can overlook their contributions.

In his remark, RCHFS Founder Chairman M L Chougule informed the participants about the society. "The deposits and loan of the society as on 28 Feb 2022 was Rs 330



crore and Rs 243 crore respectively. The total business is more than 650 crore and it has earned a profit of Rs 1.40 crore in last financial year i.e. 2020-21. The society has a network of 9 branches across the state of Maharashtra and Karnataka.

On the occasion, Chougule also placed several demands from the dais in front of the Minister. He requested that RCHFS should be allowed to operate under the Pradhan Mantri Awas Yojana. Chougule also demanded that his co-op should be allowed to expand to Goa and Delhi. "We have applied and are awaiting a response from the Central Registrar", said the Chairman asking the MoS to look into the matter and help.

Though the society is small, it is equipped with all the modern banking facilities including Mobile Banking, Micro ATM, RTGS, NEFT and others. Established in 1996 with Rs 10k share capital and 18 members, the society's share capital & funds are Rs 23 crore and more than 9100 members are associated with the society, informed the Chairman.

Besides, the society is active in social services. During the first wave of Covid-19, society distributed masks and sanitizers to the staff members of Gadhinglaj Sub-District Hospital, among others.

Union Minister of State for Cooperation B L Verma had also sent his consent for the event but due to his last minute engagement, he could not attend it. National Human Rights Commission Member Dnyaneshwar Mulay and some NCUI officials including Ashish Diwedi and Sandhya Kapoor were present.

